# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीसी/२०१८–१९/९७
दिनांक –२८ ऑगस्ट, २०१८

<u>परिपत्रक</u> :–

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र, इत्यादी महाविद्यालये (अल्पसंख्याक महाविद्यालयासह) आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था तसेच विद्यापीठातील विविध विभागांचे व संस्थाचे विभाग प्रमुख/संचालक यांना कळविण्यात येते की, शासन निर्णय क्र. <u>संकिर्ण–२०१८/प्र.क्र.२४९/१८/तांशि–४</u> दिनांक १३ जुलै,२०१८ नुसार डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी शासकीय व इतर इमारती भाडयाने देणेबाबतची कार्यपध्दती नमुद केलेली आहे तसेच शासन निर्णय <u>क्र.संकिर्ण–२०१८/प्र.क्र.२८५/तांशि–४</u> दिनांक ०२ ऑगस्ट, २०१८ नुसार शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर समिती गठीत करणेबाबत कळविले असुन शासन निर्णय क्र. <u>संकिर्ण–२०१८/प्र.क.२४९/तांशि–४</u> दिनांक १० ऑगस्ट, २०१८ मध्ये डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता भाडयाने दिलेल्या शासकीय/स्थानिक संस्था/मंडळ यांच्या मालकीच्या इमारतीमधील वसतिगृहाच्या व्यवस्थापनाकरीता व प्रवेशाकरिता नियमावली दिलेली आहे.

तसेच, असेही नमूद करण्यात येत की, वर नमुद केलेल्या शासन निर्णय मधील तरतुदींची काळजीपूर्वक अभ्यास करून संबंधित योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

परिपत्रकासोबत उपरोक्त शासन निर्णय विद्यापीठाच्या <u>www.mu.ac.in</u> या संकेतस्थळावर उपलब्ध असुन या योजनेचे सर्व संबंधित शासन निर्णय वरिल वेब साईट वर उपलब्ध असून त्यानुसार कार्यवाही करावी.

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव (प्र)

<u>माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी</u> –

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र, इत्यादी महाविद्यालये (अल्पसंख्याक महाविद्यालयासह) आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था आणि विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभाग प्रमुख/संचालक.

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव (प्र)

दि. १३/०७/२०१८

**डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी शासकीय व इतर इमारती भाडयाने देणेबाबतची कार्यपद्धती.....**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.२४९/१८/तांशि-४**
शिबीर कार्यालय, हैद्राबाद हाऊस,
सिव्हील लाईन्स, नागपूर ४४०००१.
दिनांक : १३ जुलै, २०१८

वाचा : १) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दि.१३.१०.२०१६
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीबीसी - १०/२०१७/प्र.क्र.१९६/मावक, दिनांक ०४.१०.२०१७
३) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१७ /प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७.१०.२०१७
४) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.४०७/तांशि-४, दि.२२.०२.२०१८.
५) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८ /प्र.क्र.१८५/तांशि-४, दि.१८.०६.२०१७
६) मा. मंत्री (महसूल, मदत व पुर्नवसन, सार्वजनिक बांधकाम) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११/०७/२०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीतील निर्णय

प्रस्तावना :-

संदर्भ क्रमांक १ येथील दिनांक १३.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये, राज्यात व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी/नोंदणीकृत मजूर आहेत अशा विद्यार्थ्यांना महानगराकरिता रु. ३००० प्रती माह व इतर शहरांकरिता रु. २००० प्रती माह या दराने जास्तीत जास्त १० महिन्यांकरिता निर्वाह भत्ता देण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. तसेच, संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक ०७.१०.२०१७ च्या शासन निर्णयाद्वारे ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी/नोंदणीकृत मजूर नाहीत, परंतू ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबातील दोन्ही पालकांचे उत्पन्न रुपये १ लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणीक वर्षातील १० महिन्याकरिता रु. ३००० इतका निर्वाह भत्ता देण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे संदर्भ क्रमांक ४ येथील दिनांक २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयाद्वारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी/नोंदणीकृत मजूर नाहीत, परंतू ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबातील दोन्ही पालकांचे उत्पन्न रुपये ६ लक्ष मर्यादेपर्यंत अशा विद्यार्थ्यांना महानगर क्षेत्राकरिता रु. १०,००० व इतर शहरे व ग्रामीण भागाकरिता रु. ८००० याप्रमाणे

निर्वाह भत्ता देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, नोंदणीकृत संस्थांनी वसतिगृह चालविण्याची तरतूद या शासन निर्णयात करण्यात आली आहे. संदर्भ क्रमांक ५ येथील दिनांक १६.०६.२०१८ च्या शासन निर्णयाद्वारे या योजनेची उत्पन्न मर्यादा रु. ८ लक्ष पर्यंत वाढविण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांना हा निर्वाह भत्ता शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून देण्यात येणार आहे. यापैकी रुपये १.०० लक्ष ते ८.०० लक्ष उत्पन्न मर्यादा असलेल्या विद्यार्थ्यांकरीता प्रत्येक जिल्ह्यासाठी ५०० लाभार्थी विद्यार्थी संख्या इतकी मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. रुपये १.०० लक्ष पर्यंत उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांकरीता लाभार्थी विद्यार्थी संख्येची कोणतीही मर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही.

२. व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधणे याकरीता प्रत्येक जिल्हयासाठी रुपये ५.०० कोटी इतके अनुदान नोंदणीकृत संस्थांना देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्यास अंतिम स्वरुप देण्यासाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. तसेच हे अनुदान संबंधित संस्थेस दिल्यानंतर प्रत्यक्षात बांधकाम होऊन वसतिगृहाची सुविधा निर्माण होण्यास बराचसा कालावधी लागणार आहे.

३. राज्यात सध्या विविध मागासप्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकरीता विविध वसतिगृहाच्या योजना राबविण्यात येत आहेत. तथापि, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता कोणतीही वसतिगृहाची योजना राबविण्यात येत नाही. व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांची जागेअभावी गैरसोय होऊ नये, त्यांना शिक्षण घेण्यामध्ये अडथळा येऊ नये, याकरीता स्वतंत्र वसतिगृहाची सोय उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मराठा आरक्षण व इतर मागण्यांच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी संदर्भ क्रमांक २ येथील ०४.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या मा. मंत्री (महसूल, मदत व पुर्नवसन, सार्वजनिक बांधकाम) यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीची दिनांक ११/०७/२०१८ रोजी बैठक झाली. या बैठकीत "डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" या योजनेखाली नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी शासकीय व इतर इमारती भाडयाने देणे याकरीताचे सर्वसाधारण कार्यपध्दती व नियम निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली. त्यास अनुसरुन डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या योजनेखाली नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी शासकीय व इतर इमारती भाडयाने देणे याकरीताचे सर्वसाधारण कार्यपध्दती व नियम तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय -:</u>**

डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना याखाली वसतिगृह चालविण्यासाठी शासन/स्थानिक संस्था/मंडळ यांच्या मालकीच्या इमारती नोंदणीकृत संस्थांना भाड्याने देण्याची योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून अंमलात आणण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या योजनेखाली नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी शासन/स्थानिक संस्था/मंडळ यांच्या इमारती भाडयाने देणे याकरीताची सर्वसाधारण कार्यपध्दती व नियम खालील परीच्छेद ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे राहतील.

३. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना याखाली वसतिगृह चालविण्यासाठी शासन/स्थानिक संस्था/मंडळ यांच्या मालकीच्या इमारती नोंदणीकृत संस्थांना भाड्याने देण्याकरीता सर्वसाधारण कार्यपद्धती व नियम :-

१) राज्यातील जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या शासन/स्थानिक संस्था/मंडळ यांच्या मालकीच्या व विनावापर पडून असलेल्या इमारतींची सविस्तर माहिती (इमारतीचे क्षेत्रफळ, इमारतीची स्थिती, उपलब्ध सुविधा इ.) राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या कार्यालयांच्या कार्यालय प्रमुखांनी जिल्हाधिकारी यांना तात्काळ सादर करावी.

२) ही माहिती जिल्हाधिकारी यांना सादर केल्यानंतर यासाठी संबंधित कार्यकारी अभियंता व त्या जिल्ह्यातील शासकीय तंत्रनिकेतनांमधील प्राचार्य/विभाग प्रमुख (स्थापत्य) यांनी जागेची प्रत्यक्ष पहाणी करुन यापैकी वसतिगृहासाठी उपयुक्त ठरु शकणाऱ्या इमारती निश्चित कराव्यात.

३) या इमारतींमध्ये वसतिगृह चालू करावयाचे झाल्यास सदर इमारत ज्या प्रशासकीय विभागाच्या अखत्यारीतील ज्या कार्यालयाच्या ताब्यात आहे त्या कार्यालयाच्या कार्यालय प्रमुखाच्या आणि/अथवा जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने इमारतींची डागडुजी, रंगकाम, वीज व पाण्याची व्यवस्था इत्यादी कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने पूर्ण करावीत व इमारत राहण्यायोग्य करावी. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे उपलब्ध असलेल्या परिरक्षण अनुदानातुन खर्च करण्यात यावा.

४) या योजनेखाली वसतिगृह भाड्याने देण्याकरिता इच्छूक नोंदणीकृत संस्थांकडून जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत.

५) सदरची प्रक्रिया जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर करण्यात यावी.

६) मागणी कराणारी संस्था ही मुंबई विश्वस्त कायदा, १९५० किंवा संस्था नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत नोंदणीकृत असावी.

७) अशा संस्थेचे किमान ३ वर्ष लेखापरिक्षण पूर्ण असणे आवश्यक आहे.

८) जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या संस्थांना प्राधान्य देण्यात यावे.

९) एकापेक्षा अनेक संस्थांची मागणी आल्यास अनुभवी व जास्त क्षमता असणाऱ्या संस्थांना प्राधान्य देण्यात यावे.

१०) या अर्जांची छाननी करुन गुणवत्तेनुसार संस्थेची निवड करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात येत आहेत. यासाठी जिल्हाधिकारी हे त्यांना आवश्यक वाटेल अशा स्थानिक अधिकाऱ्यांची छाननी समिती नियुक्त करतील. या स्थानिक समितीमध्ये खालील अधिकाऱ्यांचा समावेश असावा.

अ) जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

आ) स्थानिक महानगरपालिका आयुक्त/नगरपालिका मुख्याधिकारी

इ) जिल्ह्यामधील कोणत्याही विभागाच्या वरिष्ठ महिला अधिकारी

ई) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अथवा शासकीय तंत्रनिकेतन यांचे प्राचार्य

उ) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

वरील समितीच्या सदस्यांमध्ये जिल्हाधिकारी गरजेनुरुप बदल करु शकतील.

११) संस्थेची निवड केल्यानंतर त्या संस्थेशी ५ वर्षाचा भाडे करारनामा जिल्हाधिकारी यांच्या वतीने करण्यात यावा. निवड केलेल्या संस्थेने वार्षिक भाड्याची रक्कम शासनाकडे जमा करणे आवश्यक राहील. सदरचे भाडे रु.१००/-प्रतीमाह इतके नाममात्र असेल.

१२) शासकीय इमारत निवड केलेल्या संस्थेस हस्तांतरीत केल्यानंतर त्या इमारतीमधील सर्व प्रकारच्या परीरक्षणाची जबाबदारी निवड केलेल्या संस्थेची राहील. यासाठी कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडून देण्यात येणार नाही.

१३) वसतिगृहासाठी भाड्याने दिलेल्या इमारतीमध्ये आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न रुपये ८.०० लक्ष मर्यादेपर्यंत आहे अशा व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे बिगर मागास प्रवर्गातील जागेसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्याने वसतिगृहामध्ये प्रवेश देण्यात यावा.

१४) वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा जसे वीज, पाणी, इंटरनेट, खाणावळ (जेवणाची व्यवस्था), साफसफाईची व्यवस्था, सुरक्षतेची व्यवस्था इत्यादी पुरवण्याची जबाबदारी निवड केलेल्या संस्थेची राहील. यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या वसतीगृहासाठी विहीत करण्यात आलेले निकष/ नियमावली संस्थेने उपयोगात आणावी.

१५) सुविधांबाबत कोणत्याही तक्रारी प्राप्त झाल्यास आणि सुविधा असमाधानकारक असल्याचे जिल्हाधिकारी यांचे मत झाल्यास अथवा इमारतीमध्ये गैरकृत्य होत असल्याचे अथवा इमारतीचा वापर अन्य प्रयोजनासाठी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती पूर्वसूचना देऊन व संस्थेचे म्हणणे ऐकून अशा संस्थेशी केलेला करारनामा रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील. करारनामा रद्द केल्यानंतर नियत दिनांकास अथवा जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत इमारतीचा ताबा संबंधित संस्थेने जिल्हाधिकारी यांना परत करणे गरजेचे राहील. नियत दिनांकास इमारतीचा ताबा संस्थेने परत न केल्यास, संस्थेकडून प्रचलीत भाड्याच्या दुप्पट दराने महसुली वसुली करण्यात यावी.

१६) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेखाली विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या निर्वाह भत्त्याची रक्कम पात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात शासनाकडून जमा करण्यात येणार आहे.

वसतिगृहाचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून ही रक्कम निवड केलेल्या संस्थेस देण्यात येईल. या व्यतिरिक्त कोणतेही अनुदान शासनाकडून दिले जाणार नाही.

१७) वसतिगृह चालविण्यासाठी आवश्यक तो कर्मचारी वर्ग कंत्राटी तत्वावर निवड केलेल्या संस्थेने नियुक्त करणे आवश्यक राहील. या कर्मचाऱ्यांचे कोणत्याही स्वरुपाचे दायित्व शासनावर राहणार नाही. तसा उल्लेख करारनाम्यामध्ये करण्यात यावा.

१८) वसतिगृहाचे कामकाज व्यवस्थितरित्या चालू राहण्यासाठी जिल्हाधिकारी यांना आवश्यक वाटतील अशा अटी व शर्ती करारनाम्यामध्ये समाविष्ट करण्याची त्यांना मुभा राहील.

१९) या योजनेचे नियंत्रक अधिकारी म्हणून संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य हे काम पाहतील. त्यांनी प्रत्येक जिल्ह्यातील शासकीय तंत्रनिकेतनांच्या प्राचार्यांमार्फत ही योजना राबवावी.

४. हे आदेश सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महसूल व वन विभाग यांचेशी विचार विनिमय करून काढण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०७१३११०२५५९९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay A. Dharurkar

Digitally signed by Sanjay A. Dharurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2,
cn=Sanjay A. Dharurkar
Date: 2018.07.13 17:27:09 +05'30'

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
५) सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
६) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व प्रशासनिक विभाग, मंत्रालय, मुंबई
७) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
८) आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक

९) आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११) आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२) सर्व जिल्हाधिकारी
१३) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६) संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७) कुलसचिव, सर्व(कृषी/अकृषी) विद्यापीठे
१८) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड
१९) कुलसचिव, महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
२०) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२१) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
२२) सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई/नागपूर
२५) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई/नागपूर
२६) सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
२७) सह/उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२८) अवर सचिव (तांशि-३, विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२९) कक्ष अधिकारी (मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१), उ. व तं.शि. वि., मंत्रालय, मुंबई
३०) मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
३१) सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
३२) निवडनस्ती/तांशि-४.

दि.०२/०८/२०१८

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२८५/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३.
दिनांक : २ ऑगस्ट, २०१८

वाचा :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय,-

१) क्रमांक : टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक ३१ ऑक्टोबर,२०१६
२) क्रमांक : टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १५ एप्रिल,२०१७
३) क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक ७ ऑक्टोबर,२०१७
४) क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.४०७/तांशि-४, दिनांक २२ फेब्रुवारी,२०१८
५) क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक १ मार्च,२०१८
६) क्रमांक : टीईएम-२०१८/प्र.क्र.३५/तांशि-४, दिनांक ३१ मार्च,२०१८
७) क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१८५/तांशि-४, दिनांक १८ जून,२०१८
८) क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२४९/तांशि-४, दिनांक १३ जुलै,२०१८
९) मा.मंत्री, महसूल ,मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), कृषी, फलोत्पादन यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक ३१/७/२०१८ रोजी झालेल्या बैठकीमधील निदेश.

परिपत्रक :

संदर्भ क्र.१ येथील दिनांक १३ ऑक्टोबर,२०१६ च्या शासन निर्णयाव्दारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे मान्यता प्राप्त व्यावसायिक उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी “राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ करण्यात आला आहे. आता ही योजना “राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना” या नावाने कार्यान्वित आहे. संदर्भ क्र.३ येथील दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयाव्दारे या योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लाभाची व्याप्ती वाढविणे व नविन अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत आदेश

निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार व त्यानंतरच्या संदर्भ क्र.५ येथील दिनांक १ मार्च,२०१८ च्या शासन निर्णयानुसार या योजनेखाली व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक ६०५ अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती देण्यात येते.

संदर्भ क्र.१ येथील दिनांक १३ ऑक्टोबर,२०१६च्या शासन निर्णयाव्दारे ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी आहेत किंवा ज्यांचे पालक नोंदणीकृत मजूर आहेत अशा विद्यार्थ्यांकरीता शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून "डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" लागू करण्यात आली आहे. त्यानंतर संदर्भ क्र.३ येथील दिनांक ७ ऑक्टोबर,२०१७ च्या शासन निर्णयाव्दारे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून रुपये १.०० लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांकरता निर्वाहभत्ता देण्याची योजना जागू करण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र.४ येथील दिनांक २२ फेब्रुवारी,२०१८ च्या शासन निर्णयाव्दारे "डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना" शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या दोन्ही योजनांसाठी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये ८.०० लाख इतकी निश्चित करण्यात आली आहे.

तसेच संदर्भ क्र.८ येथील दिनांक १३ जुलै,२०१८ च्या शासन निर्णयाव्दारे जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी विनावापर पडून असलेल्या शासकीय व इतर इमारती नोंदणीकृत संस्थांना आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता वसतिगृह चालविण्यासाठी भाडयाने देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या दोन्ही योजनाची राज्यभरात शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी याकरीता जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर एक समिती गठीत करण्याचे निर्देश मा.मंत्री, महसूल, **मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), कृषी, फलोत्पादन** यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीने निर्देश दिले होते. त्यास अनुसरुन या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर समिती नियुक्त करण्याची बाब विचाराधीन होती.

**परिपत्रक :-**

"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" व "डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" या दोन्ही योजनांच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी खालीलप्रमाणे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे :-

१) जिल्हाधिकारी - अध्यक्ष

२) विभागीय तंत्र शिक्षण सहसंचालक अथवा त्या जिल्ह्यातील शासकीय अभियांत्रिकी/ शासकीय तंत्रनिकेतने यामधील प्राचार्य- सदस्य सचिव
३) विभागीय उच्च शिक्षण सह संचालक अथवा त्या जिल्हयातील शासकीय महाविद्यालयातील प्राचार्य -सदस्य
४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचे प्रतिनिधी -सदस्य
५) जिल्हयातील / कार्यक्षेत्रातील संबंधित कृषी व अकृषी विद्यापीठाचा प्रतिनिधी-सदस्य
६) जिल्ह्यातील नामवंत उच्च/तंत्र/वैद्यकीय/कृषी व इतर उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांचे प्रत्येकी प्रतिनिधी-सदस्य
७) जिल्हा सहाय्यक संचालक (समाज कल्याण) -सदस्य
८) जिल्हा आदिवासी विकास अधिकारी-सदस्य
९) जिल्हा सहाय्यक संचालक, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र

२. उपरोक्त जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीने "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" व "डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" या दोन्ही योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोचण्याकरीता सर्व संस्थांमध्ये जाहिरात / सूचना फलक लावण्याबाबत सर्व संबंधितांना सूचना द्याव्यात.

३. तसेच समितीने वर नमूद केलेल्या या दोन्ही योजनांच्या अंमलबजावणीच्या संदर्भात विद्यार्थ्यांकडून संस्थेने प्रवेशाच्या वेळी १०० टक्के शिक्षण शुल्क मागणे, शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या दरापेक्षा जादा शुल्क आकारणे, शिष्यवृत्तीखालील विद्यार्थी म्हणून प्रवेश नाकारणे अशा स्वरुपाच्या प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निराकरण करावे.

४. दिनांक ७ ऑक्टोबर,२०१७ व दिनांक १ मार्च,२०१८ च्या शासन निर्णयान्वये इतर मागास प्रवर्गाकरीता शिष्यवृत्तीच्या लाभासाठी मान्य करण्यात आलेले अभ्यासक्रम खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्तीसाठी अनुज्ञेय करण्यात आले असल्याने ते अभ्यासक्रम संबंधित लाभार्थ्यांच्या निदर्शनास आणण्याकरीता आवश्यक त्या उपाय योजना समितीने कराव्यात.

५. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेखालील कर्जाच्या प्रकरणाकरीता देण्यात आलेल्या LOI च्या अनुषंगाने जिल्ह्यातील विविध बँकांशी समन्वय साधून या प्रकल्पाकरीता चालना देण्याची कार्यवाही करावी.

६. हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ४ दिवसांच्या आत समितीने पहिली बैठक आयोजित करावी व त्यानंतर दर १५ दिवसांनी या दोन्ही योजनांच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा घ्यावा.

७. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पर्यंतची या विभागाच्या अथवा अन्य विभागाच्या अधिपत्याखालील पात्र लाभार्थ्यांना देय असलेल्या प्रलंबित शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांना नाहक त्रास होऊ नये, त्यांचे गुणपत्र व इतर कागदपत्रे त्यांना विहित कालावधीत मिळावी याकरीता संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने दिनांक ३१/८/२०१८ पर्यंत कॅम्पचे आयोजन समितीने करावे.

८. दिनांक १३ जुलै,२०१८ च्या शासन निर्णयाव्दारे शासकीय व इतर इमारती आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी नोंदणीकृत संस्थांना भाडयाने देण्याच्या योजनेस सर्व जिल्हाधिकारी यांनी गती द्यावी.

९. जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत असलेल्या उच्च/तंत्र/वैद्यकीय/कृषी इत्यादी संस्थांची अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता, त्यापैकी खुल्या प्रवर्गासाठी प्रत्यक्षात झालेले अथवा होणारे प्रवेश, त्यापैकी किती विद्यार्थ्यांकरीता वसतिगृहाची सुविधा स्वतंत्ररित्या करणे आवश्यक आहे या बाबींचा समग्र आढावा सदर समितीने घ्यावा.

१०. सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्या क्षेत्रीय कार्यालयांकरीता आवश्यक त्या पूरक सूचना तात्काळ प्रसारित कराव्यात.

११. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०८०२१८०७१३६५०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dinesh Kumar Jain

Digitally signed by Dinesh Kumar Jain
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Chief Secretary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ea3b8615acaf5a916338801298bc1b7123bd0cac17faf57848ccd7382e28252c, cn=Dinesh Kumar Jain
Date: 2018.08.03 12:01:01 +05'30'

( दिनेश कुमार जैन )
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी

प्रत :

१. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासनीक विभाग
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

३. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे
४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
५. संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, पुणे
६. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. आयुक्त, समाज कल्याण, पुणे
८. आयुक्त, कृषी संचालनालय, पुणे
९. आयुक्त, शालेय शिक्षण, पुणे
१०. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
११. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये
१२. सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये
१३. सर्व सहसंचालक, कला संचालनालय विभागीय कार्यालये
१४. सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१६. मा.मंत्री, महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), कृषी, फलोत्पादन यांचे खाजगी सचिव
१७. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी,
१८. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,
१९. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
२०. निवड नस्ती (तांशि-४)

दि.१०/८/२०१८

**डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेतर्गंत आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता भाड्याने दिलेल्या शासकीय /स्थानिक संस्था / मंडळ यांच्या मालकीच्या इमारतीमधील वसतिगृहाच्या व्यवस्थापनाकरीता व प्रवेशाकरिता नियमावली.**

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२४९/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक: १० ऑगस्ट, २०१८.

**वाचा :** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२४९/तांशि-४, दिनांक: १३ जुलै, २०१८.

**शासन निर्णय:**

डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेतर्गंत आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहाच्या सुविधा जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात याकरिता शासकीय /स्थानिक संस्था/ मंडळ यांच्या मालकीच्या इमारती नोंदणीकृत संस्थांना भाडयाने देण्याची योजना संदर्भाधीन दिनांक १३ जुलै,२०१८ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली आहे. शासकीय /स्थानिक संस्था/ मंडळ यांच्या मालकीच्या इमारती भाडयाने दिलेल्या वसतिगृहाच्या व्यवस्थापनाकरीता व विद्यार्थ्यांच्या प्रवेशाकरिता सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे नियमावली लागू करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०८१०११४६०२१२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay A. Dharurkar

Digitally signed by Sanjay A. Dharurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, cn=Sanjay A. Dharurkar
Date: 2018.08.10 17:16:19 +05'30'

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
५. सर्व सन्माननीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य.
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव , सर्व प्रशासनिक विभाग,मंत्रालय,मुंबई
७. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नशिक
९. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. कुलसचिव, सर्व (कृषी/अकृषी) विद्यापीठे
१८. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगाव, जि.रायगड
१९. कुलसचिव, महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
२०. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व),मुंबई ४०००५१
२१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व) (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
२२. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर
२५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर
२६. सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
२७. सह/उप सचिचव (मशि-२/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
२८. अवर सचिव (तांशि-३/विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
२९. कक्ष अधिकारी (मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३०. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
३१. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
३२. निवड नस्ती (तांशि-४)

## परिशिष्ट - अ

**शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२४९/तांशि-४, दिनांक : १३ जुलै, २०१८ अन्वये डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेतर्गंत आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता नोंदणीकृत संस्थांना भाड्याने दिलेल्या शासकीय /स्थानिक संस्था/ मंडळ यांच्या मालकीच्या इमारतीमधील वसतिगृहाच्या व्यवस्थापनाकरीता व प्रवेशाकरिता नियमावली.**

१. शासकीय /स्थानिक संस्था/ मंडळ यांच्या ताब्यातील इमारत जी संस्था वसतिगृह चालविण्यास घेईल त्या नोंदणीकृत संस्थेने वसतिगृहाच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी वसतिगृह वार्डन, सुरक्षा रक्षक, सफाई कर्मचारी तथा अन्य कर्मचारी, स्वत:च्या खर्चातून व शक्यतो कंत्राटी तत्वावर नियुक्त करणे आवश्यक राहील. याकरिता शासनाकडून कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

२. **वसतिगृहामध्ये प्रवेशासाठी पात्रता :-**

अ) सदर विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. ***

आ) विद्यार्थ्यांचे व पालकाचे मिळून एकूण वार्षिक उत्पन्न रु.८.०० लक्ष मर्यादेपर्यंत असावे.

इ) शासनाने वेळोवेळी घोषित केल्याप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे प्रवेश घेतलेले विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र असतील.

ई) बिगर व्यावसायिक उच्च शिक्षण अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र असतील.

उ) इयत्ता ११ वी व १२ वी वर्गांमध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र असतील.

टिप - व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय शिक्षण, विधी, कृषी अशा विविध अभ्यासक्रमांचा समावेश होतो. याची यादी शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकिर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि. ७ ऑक्टोबर,२०१७ सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेली आहे.

*** महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थी म्हणजे ज्या विद्यार्थ्याचा राज्यात १५ वर्षे अधिवास असून, राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाची माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा.

*** अधिवासाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकरणाचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) जोडणे आवश्यक आहे.

३. सुरक्षिततेची खात्री तसेच स्वतंत्र व्यवस्था असल्याखेरीज विद्यार्थीनींना वसतिगृहामध्ये प्रवेश देता येणार नाही. विद्यार्थीनींना प्रवेश दिले असल्यास त्यांच्याकरिता स्वतंत्र महिला कर्मचाऱ्यांची व महिला सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणे बंधनकारक राहील.

४. **वसतिगृहामध्ये प्रवेश देतांना खालील प्राधान्यक्रम विचारात घ्यावा.**

क) व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील प्रवेश घेतलेले विद्यार्थी

ख) बिगर व्यावसायिक उच्च शिक्षण अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थी

ग) इयत्ता ११ वी व १२ वी वर्गांमध्ये शिक्षण घेत असलेले आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थी

**टिप - या योजनेसाठी आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाकरीता रुपये ८.०० लाख उत्पन्न मर्यादा निश्चित केली आहे.**

५. अधिक दूरच्या ठिकाणाहून शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांस प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

६. स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्यांना वसतिगृहामध्ये प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

७. दिव्यांग आरक्षण : एकूण प्रवेशक्षमतेच्या ५% जागा दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राखीव असतील. त्यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देणे बंधनकारक असेल.

८. उपरोक्त आरक्षित जागा, स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य, अपंग यांनी याबाबतची आवश्यक ती सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

९. **प्रवेशासाठी पात्र विद्यार्थी :-**

अ) ज्या विद्यार्थ्यांना अगोदरच्या वर्षी अन्य वसतिगृहात प्रवेश मिळाला होता, असे विद्यार्थी खालील अटी पुर्ण करीत असल्यास,

i) वसतिगृहातील वास्तव्य कालावधीत त्यांच्याविरुध्द संबंधित वसतीगृहाचे वार्डन वा महाविद्यालयाकडून कोणतीही शिस्तभंगविषयक कारवाई झालेली नसावी किंवा त्यांच्या गैरवर्तणुकीबाबत संबंधित वसतिगृहाचे वॉर्डन वा संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी आक्षेप घेतलेला नसावा.

ii) अशा विद्यार्थ्याची मागील शैक्षणिक वर्षात वर्गात ७५ % उपस्थिती असल्याचे संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य अथवा संचालक यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

iii) आधीच्या शैक्षणिक वर्षात दिलेली परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असून अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार नाही.

iv) त्यानंतरच्या शैक्षणिक वर्षादरम्यान सदर विद्यार्थ्यांना उत्तीर्ण झाल्यावर वसतिगृहात जागा रिक्त असल्यासच प्रवेश देण्यात येईल.

ब) नव्याने प्रवेश घेणारे विद्यार्थी :-

i) उपरोक्त क्रमांक १ मधील विवरणपत्रात नमूद केलेल्या शासकीय महाविद्यालयात/ संस्थेत शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी,

१०. **प्रवेशासाठी अपात्रता:-**

i. विद्यार्थ्यांने ज्या संस्थेमध्ये प्रवेश घेतला आहे ती संस्था ज्या शहरात / गावात असेल आणि असा विद्यार्थि त्या शहरात / गावात वास्तव्यात असेल तर त्या विद्यार्थ्यांस वसतिगृहांमध्ये प्रवेश घेण्यासाठी अपात्र समजण्यात येईल.

ii. समांतर अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास, वसतिगृह प्रवेशास सदर विद्यार्थी अपात्र ठरेल. (एका विद्याशाखेतील पदवी प्राप्त असलेल्या विद्यार्थ्याने दुसऱ्या विद्याशाखेतील पदवीसाठी प्रवेश घेतला असल्यास किंवा एका विद्याशाखेतील पदव्युत्तर पदवी प्राप्त असलेल्या विद्यार्थ्याने दुसऱ्या विद्याशाखेतील पदव्युत्तर पदवीसाठी प्रवेश घेतला असल्यास)

iii. कोणताही नोकरी करीत असलेला विद्यार्थी हा वसतिगृह प्रवेशास अपात्र ठरेल.

iv. अर्धवेळ पदवी / पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी प्रवेशासाठी अपात्र ठरतील.

v. पी.एच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त ३ वर्षे वसतिगृहात राहता येईल. पी.एच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशाचे नुतनीकरण करताना संबंधित संस्थेच्या संचालक व मार्गदर्शक यांचे स्वाक्षरीत प्रगती अहवाल तसेच, ९० टक्के उपस्थितीचा अहवाल वसतिगृहास सादर करावा लागेल. अहवाल समाधानकारक असल्यासच प्रवेश नुतनीकरण करण्यात येईल.

११. **वयोमर्यादा :-** वसतीगृहात प्रवेश घेण्यासाठी किमान वयोमर्यादा १६ व कमाल वयोमर्यादा २५ राहील. राज्य प्रशासकीय व्यवसाय मार्गदर्शन संस्था, मुंबई व सिडनहॅम व्यवस्थापकीय व संशोधन संस्था, मुंबई तसेच पी.एच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना वयाची अट लागू राहणार नाही.

१२. वसतिगृह चालविणाऱ्या संस्थेने दरवर्षी जिल्ह्यातील महाविद्यालये सुरु झाल्यानंतर १५ जुलै, ते १ ऑगस्ट या कालावधीत सर्व महाविद्यालयातील प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांकडून योग्य ती जाहिरात करुन विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणे आवश्यक राहील. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये हा कालावधी दि.३१ ऑगस्ट, २०१८ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

१३. <u>अर्जदार विद्यार्थ्यांनी अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे</u> :-

i) मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची प्रत / चालू वर्षातील सामायिक प्रवेश परीक्षेच्या गुणपत्रिकेची प्रत.

ii) महाराष्ट्र राज्याचा निवासी असल्याचा दाखला, (Domicile Certificate) .

iii) महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतल्याचा पुरावा.

iv) पालक नोकरी करीत असल्यास आयकर नमूना १६-अ चा फॉर्म.

v) आयकर पात्र पालकांच्या आयकर विवरणपत्राची ( Income Tax Return ) प्रत.

vi) आयकर पात्र नसलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी तहसिलदार / सक्षम अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केलेल्या उत्पन्नाच्या दाखल्याची प्रत.

vii) शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांकडून प्रकृती चांगली असल्याबाबत तसेच, संसर्गजन्य रोग नसल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र.

१४. <u>सत्र कालावधी</u>:- वसतिगृहाच्या पहिल्या सत्राचा सर्वसाधारण कालावधी १० जून ते ३० नोव्हेंबर व दुसऱ्या सत्राचा कालावधी १ डिसेंबर ते ३० एप्रिल असा राहील. तथापि, अभ्यासक्रमानुसार यामध्ये बदल करता येईल.

१५. <u>शुल्क</u> :- वसतिगृह चालविणाऱ्या संस्थेस वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रतिविद्यार्थी खालील मर्यादेपेक्षा अधिक शुल्क आकारता येणार नाही.

(अ) मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इत्यादी महानगर क्षेत्रातील वसतिगृहासाठी वार्षिक रु.१००००/- प्रतिवर्ष

(ब) इतर शहरे व ग्रामिण भागातील वसतिगृहासाठी वार्षिक रु.८०००/- प्रतिवर्ष

टिप-(१) : संस्थेने वरील मर्यादेत निर्धारित केलेले शुल्क विद्यार्थ्यांनी संस्थेकडे भरणे आवश्यक राहील.

टिप-(२) डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेखाली रु.१.०० लक्ष वार्षिक उत्पन्न असलेल्या बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या उच्च शिक्षण घेणाऱ्या व उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता अनुक्रमे रु.२०००/- व रु.१,०००/- प्रतिवर्ष निर्वाह भत्ता शासनाकडून अनुज्ञेय असल्याने संस्थेने निर्धारित केलेल्या शुल्काच्या फरकाची रक्कम विद्यार्थ्याने संस्थेस देणे बंधनकारक राहिल.

टिप-(३) : वर नमूद मर्यादेपेक्षा जादा शुल्क संस्था आकारीत असल्यास संबंधित संस्थेविरुध्द कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

१६. <u>इतर सर्वसाधारण नियम</u>:-

i. प्रवेशासाठी अर्ज करताना अर्जात खोटी माहिती / कागदपत्रे सादर केल्याचे आढळून आल्यास सदर विद्यार्थ्याचा प्रवेश तात्काळ रद्द केला जाईल.

ii. ज्या विद्यार्थ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेखाली निर्वाह भत्ता अनुज्ञेय नसेल अशा वसतिगृहामध्ये प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश घेताना विहित करण्यात आलेले व देय असणारे शुल्क प्रत्येक सत्राच्या सुरुवातीस भरणे आवश्यक राहील.

iii. विद्यार्थ्यांनी खानावळीची सोय उपलब्ध असल्यास खानावळीचे प्रत्येक महिन्याचे आगाऊ मासिक शुल्क व्यवस्थापनाकडे जमा करावे.

iv. विद्यार्थी उन्हाळी सुट्टीत महाविद्यालयाचे विशेष वर्ग, सी.ई.टी., Summer Training इत्यादी कारणास्तव वसतिगृहात राहण्यास इच्छूक असेल, तर संबंधित महाविद्यालय / संस्थेचे प्राचार्य व संचालक यांच्याकडून याबाबत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. या कालावधीसाठी संबंधित विद्यार्थ्यास संस्था निश्चित करेल असे शुल्क भरावे लागेल. मात्र, याबाबतीत तो हक्क सांगू शकणार नाही.

v. जर एक आठवड्यापेक्षा जास्त दिवस विद्यार्थ्यास बाहेर जावयाचे असेल, तर जाण्यापूर्वी त्याने व्यवस्थापन कार्यालयास लेखी कळविणे आवश्यक आहे. जर, विद्यार्थी समाधानकारक कारण न देता गैरहजर राहिला व वसतिगृहाचे नियम तोडण्याचा प्रयत्न केला तर वसतिगृह प्रमुख त्या विद्यार्थ्यास खोली रिकामी करण्यास सांगू शकेल.

vi. वसतिगृह चालविणारी संस्था वसतिगृहातील कोणत्याही विद्यार्थ्याचा गैरवर्तणूक / शिस्तभंग या कारणास्तव वसतिगृहातील प्रवेश संबंधित महाविद्यालय / संस्थेचे प्राचार्य / संचालक यांच्या सहमतीने रद्द करु शकतील.

vii. वसतिगृहात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने वसतिगृहाचे नियम पाळणे आवश्यक आहे व वसतिगृहातील विद्यार्थ्याची एकूण वर्तणूक वसतिगृह प्रशासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार असणे विद्यार्थ्यावर बंधनकारक राहील.

viii. वसतिगृहात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी वसतिगृहात राहताना विहित केलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे, त्यासाठी आवश्यक आचार संहिता वसतिगृह वार्डननी तयार करुन सत्राच्या सुरुवातीस सर्व विद्यार्थ्यांच्या व्यक्तीशः निदर्शनास आणून द्यावी. ही आचार संहिता सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील. अन्यथा, त्यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार संबंधित संस्थेस राहतील.

ix. जर एखाद्या विद्यार्थ्यास संस्थेविरुध्द /व्यवस्थापनाविरुध्द तक्रार असेल, तर तो विद्यार्थी संबंधित जिल्हाधिकारी तसेच विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण /उच्च शिक्षण यांच्याकडे लेखी तक्रार करु शकेल.

x. प्रत्येक विद्यार्थ्यास महाविद्यालय / संस्थेच्या प्राचार्य / संचालकाकडून प्रत्येक सत्रात ७५ टक्के हजेरीबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. तसे नसल्यास याबाबतची सबळ कारणमिमांसा द्यावी लागेल.

१७. वसतीगृहात इतर अभ्यागतांचा अधिवास अनुज्ञेय नाही.

१८. वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा जसे वीज, पाणी, इंटरनेट, खाणावळ (जेवणाची व्यवस्था), साफसफाईची व्यवस्था, सुरक्षतेची व्यवस्था इत्यादी पुरवण्याची जबाबदारी निवड केलेल्या संस्थेची राहिल. यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत

चालविल्या जाणाऱ्या वसतिगृहासाठी विहित करण्यात आलेले निकष/नियमावली संस्थेने उपयोगात आणावी.

१९. सुविधांबाबत कोणत्याही तक्रारी प्राप्त झाल्यास आणि सुविधा असमाधानकारक असल्याचे जिल्हाधिकारी यांचे मत झाल्यास अथवा इमारतीमध्ये गैरकृत्य होत असल्याचे अथवा इमारतीचा वापर अन्य प्रयोजनासाठी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती पूर्वसूचना देऊन व संस्थेचे म्हणणे ऐकून अशा संस्थेशी केलेला करारनामा रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील. करारनामा रद्द केल्यानंतर नियत दिनांकास अथवा जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत इमारतीचा ताबा संबंधित संस्थेने जिल्हाधिकारी यांना परत करणे गरजेचे राहिल. नियत दिनांकास इमारतीचा ताबा संबंधित संस्थेने जिल्हाधिकारी यांना परत करणे गरजेचे राहिल. नियत दिनांकास इमारतीचा ताबा संस्थेने परत न केल्यास, संस्थेकडून प्रचलित भाडयाच्या दुप्पट दराने महसुली वसुली करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

२०. हे नियम सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून लागू होतील.

२१. या व्यतिरिक्त आवश्यकतेनुसार शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.वसति-५३१४/प्र.क्र.१७७/मशि-२, दि.२३ मे, २०१६ अन्वये विहित करण्यात आलेल्या प्रवेश नियमावलीतील तरतूदी वसतिगृह व्यवस्थापनासाठी लागू राहतील.

२२. जिल्हयातील शासकीय तंत्रनिकेतनांचे प्राचार्य यांनी सदर वसतिगृहास वेळोवेळी भेट देवून त्याचा अहवाल जिल्हाधिकारी यांना तसेच संचालक, तंत्र शिक्षण यांना सादर करणे आवश्यक राहिल.

२३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई अथवा जिल्हाधिकारी यांना वसतिगृहाच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी संबंधित संस्थांना या व्यतिरिक्त आवश्यक त्या सूचना देण्याचे अधिकार राहतील.

*****************